| MHAK070004952023 | **<u>फौ.कि.अर्ज क्र. १०२/२०२३ मधील निशाणी ४ वरील आदेश</u>**<br>अपेक्षा नंदन इंगोले वि. नंदन बाबुराव इंगोले<br>(दिनांक २३ ऑगस्ट, २०२४) |
|---|---|

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये अर्जदारांना गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा प्रत्येकी रु.१०,०००/– अंतरिम पोटगी व शेगांव येथे घर भाडयाने घेवुन द्यावे किंवा घरभाडेकरीता दरमहा रु.३,०००/– चा आदेश होण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी असुन त्यांचे लग्न दिनांक ०४.०७.२०१४ रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे झाले. सदर लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदार क्र. २ ही मुलगी असुन गैरअर्जदार क्र. २ सासु व गैरअर्जदार क्र. ३ दिर आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्नामध्ये अर्जदार हिचे वडीलांनी रु. ११,००,०००/– चे सोन्याचे दागीने व रु. १,५०,०००/– चे संसार उपयोगी वस्तु दिले व लग्नाकरिता रु. ४,००,०००/– असे एकुण रु. १६,५०,०००/– खर्च केला. लग्नामध्ये दिलेले सर्व स्त्रीधन गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे.

३. लग्नानंतर अर्जदार क्र. १ हिला सुरुवातीचे काही दिवस गैरअर्जदारांनी चांगली वागणुक दिली. त्यांनतर सर्व गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेत असत, तिचा मोबाईल तपासुन पाहत होते व अर्जदार क्र. १ हिचे माहेरचे गावातील मुलाशी अनैतिक संबंध आहे असे म्हणुन गैरअर्जदार क्र. १ दारु पिवुन अर्जदार क्र. १ ला मारहाण करीत होता. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ च्या वडीलांकडुन अमरावती येथे घर घेणेसाठी रु. १०,००,०००/– आणण्याची मागणी करीत होते व त्या कारणासाठी अर्जदार क्र. १ हिला उपाशी ठेवत होते. दि. ०७.०१.२०१६ रोजी अर्जदाराला मुलगी झाली. तेव्हा गैरअर्जदारांना मुलगा पाहिजे होता व गैरअर्जदारांच्या घरात सावळया रंगाचे कोणीही नाही. अर्जदार क्र. २ ही सावळया रंगाची असुन ती अर्जदार क्र. १ ला इतर कोणापासुन झाली असे बोलुन मानसिक छळ करीत होते. गैरअर्जदार क्र. १ चे वडील अर्जदार हिला मुलीप्रमाणे पाहत होते तेव्हा गैरअर्जदार क्र. २ ही गैरअर्जदार क्र. १ च्या

वडीलांचे व अर्जदार क्र. १ हिचे अनैतिक संबंध आहेत असे खोटे आरोप करीत होती. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिला नेहमी दारु पिवुन मारहाण करीत असे. गैरअर्जदार क्र. १ च्या वडीलांना ह्दय विकार झाल्यावर ते हॉस्पीटल मध्ये असतांना अर्जदार क्र. १ सोबत गैरअर्जदार क्र. ३ घरी असतांना गैरअर्जदार क्र. ३ ने दारु पिवुन अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेवुन वाद घातला व अर्जदार क्र. १ ला विषारी औषध पाजण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अर्जदार ही जीव वाचविण्याचे उद्देशाने तिचे भावासोबत माहेरी गेली असता अर्जदारांनी खोटे बोलुन अर्जदाराला परत आणले. अर्जदार क्र. १ चे सासरे मयत झाल्यावर गैरअर्जदार क्र. १ व ३ दारु पित होते व घरात बाहेरच्या लोकांना आणुन दारु व मटनाच्या पाटर्या करीत होते. त्यावेळेस अर्जदार क्र. १ ने विरोध केला असता गैरअर्जदार क्र. १ व ३ मारहाण करीत होते. अमरावती येथे घर विकत घेणेसाठी अर्जदाराच्या वडीलाकडुन रु. १०,००,०००/– आणल्या शिवाय घराय यायचे नाही अशी धमकी गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला दिली व तिचे भावासोबत तिला माहेरी जबरदस्तीने पाठवुन दिले. तेव्हापासुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ सह माहेरी राहत आहे.

**४.** दि. १५.११.२०११ रोजी रात्री ०८.०० ते ०९.०० वाजताचे दरम्यान गैअरर्जदार क्र. १ व ३ अर्जदाराच्या माहेरी आले व दुसरे लग्न करायचे आहे असे म्हणुन घटस्फोटाची मागणी केली व घटस्फोट न दिल्यास गैरअर्जदार क्र. १ जिवाचे बरे वाईट करेल व अर्जदार क्र. १ त्याला जबाबदार राहिल असे सांगितले. तसेच घटस्फोट न दिल्यास अर्जदार क्र. १ ला जिवाने मारुन टाकेल अशी धमकी गैरअर्जदार क्र. १ ने दिली. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदारांविरुध्द पोलीस स्टेशन उरळ येथे रिपोर्ट दिला.

**५.** गैरअर्जदारांकडे ४२ एकर बागायती शेती आहे, त्यापैकी १५ एकर शेती गैरअर्जदार क्र. १ चे नावावर असुन १० एकर शेत सामाईकातील आहे व उर्वरित शेती गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्या नावावर आहे. गैरअर्जदार क्र. १ ला १५ एकर बागायती शेतीमधुन दरवर्षी रु. १५,००,०००/– व सामाईकातील शेतीमधुन १०,००,०००/– मिळते. गैरअर्जदारांकडे एकत्रित कुटुंबातील सात खोल्यांचे पक्के घर आहे व एक घर तीन खोल्यांचे आहे. गैरअर्जदांकडे सामाईकातील अंजनगाव सुर्जी येथे एक प्लॉट, मारोती कंपनीची स्विफ्ट डिझायर कार, ट्रॅक्टर, शेतातील पिक काढायची मशीन आहे.

गैरअर्जदार क्र. १ याचेवर अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही.

६. अर्जदार हिचेकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती स्वतःचा व अर्जदार क्र. २ हिचा उदरनिर्वाह करण्यास तसेच अर्जदार क्र. २ चे शिक्षणाकरिता खर्च करणेस असमर्थ आहे. अर्जदार क्र. २ हिच्या शिक्षणाकरिता अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. २०००/– वाहन खर्च येतो. शाळेचे साहित्य व ड्रेस करिता रु. १०,०००/– येतो. अर्जदारांना खाण्यापिण्यासाठी, कपडयालत्यासाठी व औषधोपचारासाठी व अर्जदार क्र. २ च्या शिक्षणाकरिता दरमहा रु. १०,०००/– खर्च येतो. तसेच जिवनोपयोगी वस्तुंच्या वाढत असलेल्या किंमती व अर्जदाराचे राहणीमान पाहता अर्जदारांना दरमहा प्रत्येकी रु. १०,०००/– अंतरिम खावटी व अर्जदारांना शेगांव येथे घर भाडयाने घेवुन देण्याचा किंवा दरमहा रु. ३०००/– देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

७. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जावर नि. ११ अन्वये त्यांचे म्हणणे दिलेले असून अर्जदारासोबत लग्न झाल्याचे कबुल केले असुन अर्जातील इतर कथने अमान्य केलेली आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या अधिकच्या कथनात म्हटले की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेत होती व त्यांना घरा बाहेर जावु देत नव्हती. अर्जदार क्र. १ चा भाउ गैरअर्जदार क्र. १ च्या माघारी अर्जदार हिला माहेरी घेवुन जात होता व माहेरी जावुन नको असे म्हटल्यास अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ला अपमानास्पद बोलत होती. अर्जदार क्र. १ हिला सासरी करमत नाही म्हणुन शेगांव येथे राहायला जाण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ कडे तगादा लावत होती. अर्जदार माहेरी गेल्यावर अर्जदार क्र. १ चे भाउ गैरअर्जदार क्र. १ ला 'आम्हाला आमच्या बहिनीची फारकती पाहिजे तुम्ही तिच्या लायकीचे नाही, तुम्ही तिची हौस मौज पुरवु शकत नाही.' असे बोलत होते. गैरर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ ला समजावुन घरी परत आणत होते व अर्जदार क्र. १ ही काही दिवस चांगली वागत होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ला सतत म्हणत असे की, १० एकर शेत माझ्या नावावर करुन द्या. गैरअर्जदार क्र. २ आजारी असतांना अर्जदार क्र. १ ही विचारपुस करीत नव्हती. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला मुलीप्रमाणे चांगली वागणुक दिली पण तिला एकत्रित कुटुंबात रहावयाचे नव्हते त्यामुळे ती वाद घालत होती.

८. सन २०२२ मध्ये दिवाळीच्या वेळेस रात्री १२.३० वाजताच्या दरम्यान

अर्जदार क्र. १ हिचा भाउ मनोज राउत कारंजा रमजानपुर येथे ५–६ गुंड प्रवृत्तीच्या लोकांना घेउन लोखंडी फाटकावरुन आत आले व गैरअर्जदार क्र. १ च्या डोळयात लाल मिर्ची पावडर टाकली व गैरअर्जदार क्र. १ च्या कपाटातील आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर महत्वाचे कागदपत्रे घेवुन गेले. सदर घटनेचा रिपोर्ट पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथे दिला आहे. अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदारांनी माहेरी जावुन नको म्हटले असता तिने फाशी घेण्याचा प्रयत्न केला होता व अंगावर रॉकेल घेतले होते. तसेच लग्नामध्ये मिळालेले सोने व त्याच्या मुळ पावत्या सोबत घेवुन गेली आहे. गैरअर्जदारांना खोटया केसमध्ये फसविण्यासाठी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा कोणताही शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ केलेला नाही. अर्जदार क्र. १ हिला मध्यस्थांमार्फत ५–६ वेळा समजावले परंतु ती ऐकण्याच्या मनिस्थितीत नव्हती.

९. गैरअर्जदार क्र. ३ हा वेगळा राहत असुन गैरअर्जदार क्र. २ ची पालनपोषणाची, औषधोपचाराची जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. गैरअर्जदार क्र. १ शेती व्यवसाय करत असुन तो पाउस व निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे पिकाचे नुकसान होते व उत्पन्न निघत नसुन शेती व्यतिरिक्त गैरअर्जदार क्र. १ कडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे ते खावटी देण्यास असमर्थ आहे. तसेच अर्जदार क्र. १ चा त्यांनी छळ केला नाही. अर्जदार क्र. १ ही शेगांव येथे शिक्षिका असुन तिला दरमाह रु. १५,०००/– ते रु. २०,०००/– मिळतात. त्यामुळे अर्जदार स्वतःचे व अर्जदार क्र. २ चे पालनपोषन व उदरनिवार्ह करण्यास सक्षम आहे. गैरअर्जदार क्र. १ अर्जदार क्र. १ व २ चे पालनपोषण करण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदारांना खावटी देण्यास असमर्थ आहे. तसेच अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदारांना खोटया केस मध्ये फसविण्याच्या धमक्या दिल्या व कलम ४९८अ चे खोटे प्रकरण दाखल केले आहे. गैरअर्जदांनी अर्जदाराला कोणताही मानसिक व शारिरीक त्रास दिलेला नाही. सदर दाखल प्रकरण खोटे, काल्पनिक व वस्तुस्थिती लपविल्याचे कथन केले आहे. म्हणुन अर्जदार हिचा अंतरिम खावटी मिळण्याचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

१०. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांचा युक्तीवाद ऐकला.

११. उभयपक्षांच्या कथनांच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत

पोहोचण्याकरीता खालील प्रश्न विचारार्थ येतात. सदर प्रश्नांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| अ.नं. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हिने गैरअर्जदारांकडून तिचा कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे का ? | .. | **होकारार्थी.** |
| २. | गैरअर्जदार क्र.१ ला उत्पन्नाचे पुरेसे साधन असतानाही त्याने कोणत्याही योग्य कारणाशिवाय अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे किंवा दुर्लक्ष केल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे का ? | .. | **अंशतः होकारार्थी.** |
| ३. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | .. | **अंशतः होकारार्थी.** |
| ४. | आदेश काय ? | .. | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :–**

**१२.** अर्जदार यांचा मुळ अर्ज, निशाणी ४ वरील अंतरीम अर्ज तसेच गैरअर्जदार यांचे नि.क्र.११ वरील म्हणणे पाहता उभयपक्षाने विवाह नाते संबंध इत्यादी बाबी मान्य आहे.

**१३.** अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन सासरहुन हाकलुन दिल्यापासुन ती माहेरी दुःखी व कष्टदायक जीवन जगत असुन ती तिच्या जिवनावश्यक मुलभुत गरजा भागवण्यास असमर्थ आहे. अर्जदारांना उत्पन्नाचे स्वतंत्र कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदारांचे म्हणणे की, गैरअर्जदारांकडे ४२ एकर बागायती शेती आहे, त्यापैकी १५ एकर शेती गैरअर्जदार क्र. १ चे नावावर असुन १० एकर शेत सामाईकातील आहे व उर्वरित शेती गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्या नावावर आहे. गैरअर्जदार क्र. १ ला १५ एकर बागायती शेतीमधुन दरवर्षी रु. १५,००,०००/– व सामाईकातील शेतीमधुन १०,००,०००/– उत्पन्न मिळते.

अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ च्या उत्पन्नाबाबत मालमत्ता आणि दायित्व प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार यांचे राहणीमान, जिवनावश्यक वस्तुंचा दर, गरजा पाहता या अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिने मासिक प्रत्येकी रु. १०,०००/– अंतरीम पोटगीची व अर्जदारांना शेगांव येथे घर भाडयाने घेवुन द्यावे किंवा दरमहा रु. ३०००/– घरभाडे द्यावे अशी मागणी केली आहे.

**१४.** गैरअर्जदार यांनी त्यांचे कथनात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी कोणताही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. अर्जदार गैरअर्जदार क्र. १ यास सांसारिक सुखापासुन वंचित ठेवुन गैरअर्जदार क्र. १ चे वैवाहिक जिवन उध्वस्त केले आहे. गैरअर्जदारांना फक्त त्रास देण्याच्या हेतुने खोटा अर्ज दाखल केलेला आहे. गैरअर्जदार यांनी त्याचे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रं. १५ वर दाखल केले आहे.

**१५.** वर नमुद केल्याप्रमाणे उभयपक्षांमधील नातेसंबंध मान्य असल्याने अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर विवाहाची पत्नी आहे. अर्जदाराशी असलेले नातेसंबंध मान्य असल्यामुळे अर्जदाराची पालन पोषणाची, उदरभरणाची सर्वस्वी कायदेशीर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांची आहे.

**१६.** अर्जदाराचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र पाहिल्यास असे दिसून येते की, अर्जदाराचे शिक्षण इयत्ता बी.ए. द्वितीय वर्षापर्यंत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. २ च्या शाळेचे शुल्क भरल्याच्या पावत्या अभिलेखावर दाखल केलेल्या आहे. तसेच गैरअर्जदारांकडे ४२ एकर बागायती शेती असुन त्यापैकी १५ एकर शेती गैरअर्जदार क्र. १ चे नावावर असुन १० एकर शेत सामाईकातील आहे व उर्वरित शेती गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्या नावावर आहे. गैरअर्जदार क्र. १ ला १५ एकर बागायती शेतीमधुन दरवर्षी रु. १५,००,०००/– मिळत असल्याचे शपथेवर सांगितलेले आहे. निशाणी ३ सोबत दाखल केलेल्या प्रथम खबर अहवाल वरुन प्रथमदर्शनी गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येते.

**१७.** याउलट गैरअर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेल्या मालमत्ता दायित्व प्रतिज्ञापत्रात त्याच्याकडे १५ एकर शेती असल्याचे नमुद आहे. गैरअर्जदारांच्या शेतीच्या ७/१२ उताऱ्यांच्या प्रती अभिलेखावर अर्जदाराने दाखल केल्या आहेत. त्यावरुन

गैरअर्जदार क्र. १ यांचे नावे ५ हे. ८७ आर., गैरअर्जदार क्र. ३ चे नावे ५ हे. ५२ आर. आणि गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचे नावे सामाईक क्षेत्र २ हे. ८३ आर. असल्याचे दिसुन येते. सदर ७/१२ उताऱ्याची पाहणी केल्यास २०२० ते २०२२ या वर्षात गैरअर्जदार यांनी तुर, सोयाबीन, हरभरा, कापुस अशी पिके घेतलेली असुन अर्जदार क्र. १ आणि ३ यांच्या नावे असलेले क्षेत्र बागायती असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र. १ ची आई त्यांच्यावर अवलंबून असल्याचे गैरअर्जदार क्र. १ ने दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्वच्या प्रतिज्ञापत्रात नमुद आहे.

**१८.** सदर मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रातील कथन लक्षात घेता ही बाब स्पष्ट होते की, गैरअर्जदार क्र.१ वर त्याचे आई अवलंबून आहे असे असले तरी गैरअर्जदार क्र.१ त्याच्या अर्जदाराप्रती असलेल्या जबाबदारीतून मुक्त होवू शकत नाही. गैरअर्जदार क्र.१ कडे शेती असल्याचे अर्जदाराच्या कथनाप्रमाणे नमुद आहे, परंतु अर्जात व प्रतिज्ञापत्रात कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदारांचे सात खोल्यांचे पक्के घर आणि तीन खोल्यांचे घर याबाबत अर्जदाराने अभिलेखावर कोणताही दस्त दाखल केलेला नाही. असे असले तरी गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्या नावाने वर नमुद केल्याप्रमाणे शेतमिळकत असल्याने त्यांच्याकडे ट्रॅक्टर असलेबाबत अर्जदाराने शपथेवर केलेले कथन संयुक्तिक दिसुन येते. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ शिक्षीका असुन तिला दरमहा रु. १५ ते २० हजारचे उत्पन्न मिळत असल्याबाबतचे कथनापृठयर्थ गैरअर्जदार यांनी कोणतेही दस्त अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदारांचे कथन संयुक्तिक दिसुन येत नाही.

**१७.** अर्जदार यांच्या जिवनावश्यक तसेच वैद्यकीय खर्चासह दरमहा खर्च व गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाचा विचार करता व गैरअर्जदार क्र.१ यांच्यावरील कौटुंबिक जबाबदारी पाहता या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र. १ यास दरमहा रु.३,०००/– आणि अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रु. १,५००/– अशी एकुण रक्कम रु. ४,५००/– अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. अर्जदारांच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अर्जदार सध्या वडीलांकडे राहत आहे. अर्जदाराने दरमहा रु.३,०००/– घरभाडे द्यावे, अशी मागणी केलेली आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ने घरभाडे पोटी रु.१,५००/–

अर्जदारास आदेश झाल्याच्या तारखेपासून द्यावे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार बऱ्याच कालावधी पासुन स्वतंत्र राहत असल्याने अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार होईल अशी शक्यता दिसुन येत नाही. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराबाबत अंतरिम आदेश देण्याची आवश्यकता दिसुन येत नाही. वरील सर्व परिस्थिती विचारात घेता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' व मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर 'अंशतः होकारार्थी' देऊन पुढील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

(१) अर्ज नि.क्र. ४ अंशतः मंजुर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदार क्र. १ याने अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतीम निकालापर्यंत अर्जदार क्र. १ यास दरमहा रु.३,०००/– आणि अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रु. १,५००/– अशी एकुण रक्कम रु. ४,५००/– आणि घरभाडे म्हणुन रु.१,५००/– असे एकत्रितरित्या दरमहा रु.६,०००/– (रुपये सहा हजार मात्र) इतकी अंतरिम पोटगी द्यावी.

(३) सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

(४) प्रस्तुत आदेशाची एक प्रत संबंधीत पोलीस ठाण्याला व संबंधीत संरक्षण अधिकारी यांना पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात यावी.

(५) गैरअर्जदार क्र. १ यांनी अंतरिम खावटीची रक्कम भरणेस कसुर केल्यास अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३१ प्रमाणे कार्यवाही करण्याची मुभा राहील.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.09.30 13:12:48 +0530

दिनांक : २३/०८/२०२४.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.